मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# वारकरी संप्रदायाकडून समाज घडविण्याचे कार्य : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## कुरेकर महाराज यांना "शांतीब्रह्म" पुरस्कार प्रदान : ढोक महाराज यांना "तुलसीदास" पुरस्कार प्रदान



**पिंपरी | प्रतिनिधी**

आळंदी येथे फ्रुट वाले धर्मशाळा येथे झालेल्या ह.भ.प मारोती महाराज कुरेकर यांच्या ९३ व्या व ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांच्या ७० व्या अभिष्टचिंतन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ह.भ.प. कुरेकर महाराज यांना "शांतीब्रह्म" पुरस्कार आणि ह.भ.प. ढोक महाराज यांना "तुलसीदास" पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच संतपूजन करण्यात आले.

यावेळी सार्वजनिक बांधकाम (सार्व. उपक्रम) मंत्री दादा भुसे, खासदार श्रीरंग बारणे, म्हाडा पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हभप संदीपान महाराज शिंदे (हासेगावकर), ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार प्राप्त हभप संजय महाराज पाचपोर आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र ही संतांची भूमी असून मोठी संत परंपरा आपल्याला लाभल्याचे सांगून मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, संत परंपरा, वारकरी पंथ हे महाराष्ट्राचे वैभव आहे. राजकीय अधिष्ठानापेक्षा वारकरी पंथाचे अध्यात्मिक आणि धार्मिक अधिष्ठान मोठे आहे. कारण धकाधकीच्या आयुष्यात पांडुरंगाचे नामस्मरण करताना चांगले विचार, चांगले कार्य करण्याचे विचार मनात येतात, दुष्ट विचार दूर जातात. मला काय मिळाले यापेक्षा दुसऱ्याला काय देणार हे महत्त्वाचे आहे. स्वत:साठी जगत असताना दुसऱ्याचे दु:ख वाटून घेण्याचे काम करणाऱ्यांपैकी वारकरी संप्रदाय आहे, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, आजचा कार्यक्रम आपल्या आयुष्यातला आगळा वेगळा कार्यक्रम आहे. संतांचे पूजन करणे यापेक्षा वेगळे भाग्य नाही. हभप मारोती महाराज कुरेकर, हभप रामराव महाराज ढोक आणि वारकरी संस्थेचे योगदान मोठे आहे. शिकवणाऱ्याला मानधन नाही आणि शिकणाऱ्यालाही शुल्क नाही अशी जगात नसेल अशी ही संस्था आहे. १०७ वर्षे झालेली ही संस्था आपले नाव जपण्याचे काम करत आहे. सुसंस्कृत पिढी घडविण्याचे काम ही संस्था करत आहे, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी संस्थेचा आणि हभप कुरेकर महाराज आणि हभप ढोक महाराज यांचा सन्मान केला.

गेल्या २ वर्षात शासनाने ६०० च्यावर निर्णय घेतले, असे सांगून मुख्यमंत्री पुढे म्हणाले, आम्ही नियोजन करून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. मी देखील सामान्य शेतकऱ्याचा मुलगा आहे. मलाही गरिबी माहिती आहे. सर्वात जास्त अर्थव्यवस्था चोख बजावणारी लाडकी बहीण सगळ्यात हुशार असते. म्हणून ही योजना सुरू केली. माझी लाडकी बहिण योजनेसाठी वर्षभराची तरतूद केली असून दरमहा निश्चित रक्कम मिळणार आहे. या योजनेबरोबरच लेक लाडकी लखपती योजना, मुलींना व्यावसायिक उच्च शिक्षण मोफत करण्याचा निर्णय, एस. टी. प्रवासात महिलांना ५० टक्के सवलत, ज्येष्ठांसाठी वयोश्री योजना आदी योजना राबवित आहे. शासनाने शेतकऱ्यांना अतिवृष्टी, गारपीट, दुष्काळ आदीसाठी आतापर्यंत १६ हजार कोटी रुपये नुकसान भरपाई दिली आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीला राज्याच्या नमो महासन्मान योजनेची ६ हजार रुपयांची जोड देऊन वर्षाला एकूण १२ हजार रुपये देण्यात येत आहेत. १ रुपयात पीक विमा देणारे हे देशातील पहिले सरकार असून ७.५ एच. पी. पर्यंतच्या शेतीपंपाचे वीज बिल माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य शासनाने एकीकडे बंद पडलेले प्रकल्प सुरू केले.

# आमदार महेश लांडगे यांना जिवे मारण्याची धमकी; आरोपी ताब्यात

## यांप्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.



**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरीचे आमदार महेश लांडगे यांना एका व्यक्तीने जिवे मारण्याची धमकी दिली. त्याला पिंपरी चिंचवड पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. उदयकुमार राय (रा. भोसरी. मूळ रा. छत्तीसगड) असे ताब्यात घेतलेल्या संशयित व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी दुपारी उदयकुमार राय नावाच्या व्यक्तीने पिंपरी चिंचवड पोलीस नियंत्रण कक्षाला फोन केला. आमदार महेश लांडगे यांची सुपारी मला मिळाली असल्याचे त्याने नियंत्रण कक्षात फोन करून सांगितले. त्यानंतर पोलिसांची एकच धावपळ उडाली. पोलिसांनी तत्काळ तांत्रिक विश्लेषण करून फोनवर बोलणाऱ्या व्यक्तीचा ठावठिकाणा शोधला आणि त्याला ताब्यात घेतले.

याप्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. उदयकुमार हा मागील पाच वर्षांपासून भोसरी परिसरात राहत आहे. त्याने अशा प्रकारचा फोन का केला, याबाबत पोलीस तपास करीत आहेत.

उदयकुमार राय हा छत्तीसगडचा असून गेल्या पाच वर्षांपासून तो भोसरी मध्ये राहत आहे. त्याला भोसरी एमआयडीसी पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. नेमकं धमकी देण्याचं कारण अद्याप समजू शकलं नाही. त्याचा तपास पोलीस करत आहेत.

# गणेशोत्सवासाठी कोकणवासीयांना घेवून पिंपळे गुरव येथून पाच बसेस मार्गस्थ

## भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गणपती बाप्पाची आरती करून कोकणी बांधवांना प्रवासाच्या शुभेच्छा दिल्या.



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमध्ये राहणाऱ्या कोकणवासीयांना गणेशोत्सवासाठी कोकणातील आपापल्या गावी जाणे सुलभ व्हावे, यासाठी भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपळे गुरव येथून शुक्रवारी संध्याकाळी पाच बसेसमधून 250 हून अधिक बांधव कोकणाकडे मार्गस्थ झाले. भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गणपती बाप्पाची आरती करून कोकणी बांधवांना प्रवासाच्या शुभेच्छा दिल्या.

कोकणात गणेशोत्सवाचा एक वेगळाच जल्लोष पाहायला मिळतो. कोकणात गणेशोत्सवाला विशेष महत्त्व दिले जाते. गणेशोत्सवात गावी जाणाऱ्या चाकरमान्यांची संख्या फार मोठी असते. गणेशोत्सव आणि कोकण हे एक अनोखं समीकरण नेहमीच पाहवयास मिळते. पिंपरी-चिंचवड शहरात स्थायिक असलेल्या प्रत्येक कोकणवासियांची गणपती उत्सवासाठी दरवर्षी लगबग सुरु असते. सहा महिने आधीच रेल्वे किंवा एसटी बुकिंग करण्यास सुरुवात होते. परंतु, आयत्यावेळी बुकिंग मिळणे कठीण होत असल्याने त्यांना प्रवासाला मुकावे लागते. पिंपरी चिंचवड शहरात वास्तव्यास असलेल्या कोकणस्थ कुटुंबांना गणेशोत्सव आपल्या गावी साजरा करता यावा, यासाठी सावंतवाडी, कणकवली, मालवण, चिपळूण आदी ठिकाणी मोफत बस पाठवण्यात आल्या.

यावेळी ओबीसी मोर्चा अध्यक्ष राजेंद्र राजापुरे, भाजपचे शहर सरचिटणीस अजय पाताडे, माजी नगरसेवक सागर आंगोळकर, राहुल जवळकर, माजी नगरसेविका उषाताई मुंडे, माजी स्वीकृत नगरसेवक महेश जगताप, विठ्ठल भोईर, गणेश बँकेचे माजी अध्यक्ष संजय जगताप, संजय मराठे, सखाराम रेडेकर, उज्वला गावडे, शेखर चिंचवडे, दिपक जाधव, राजेंद्र चिंचवडे, पाटिलबुवा चिंचवडे, अनिकेत दळवी आदी उपस्थित होते.

# बाप्पांच्या शांततापूर्ण उत्सवासाठी पोलिसांचा तगडा बंदोबस्त

## शहरात सर्वत्र असणार मोठा फौजफाटा, गणेशोत्सवात मद्य दुकाने बंद ठेवण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

शहराचे भूषण असलेला गणेशोत्सवाचा देदीप्यमान सोहळा शनिवारपासून (दि. ७) सुरू होत आहे. या सोहळ्यासाठी शहर पोलीस दल सज्ज झाले असून उत्सव शांततेत पार पडावा, यासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. तब्बल सात हजार पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

कोणताही अनुचित प्रकार न घडता वेळेत विसर्जन मिरवणुका समाप्त करण्यासाठीदेखील नियोजन करण्यात आलेले आहे. पोलिसांनी गुन्हेगारांवर बारीक लक्ष ठेवण्यास सुरुवात केली असून जवळपास १७४२ लोकांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. वाढती गुन्हेगारी आणि उत्सवादरम्यान होणारी गैरकृत्य रोखण्यासाठी फरासखाना-विश्रामबाग आणि खडक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मद्य दुकाने दहा दिवस आणि अन्य पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मद्य दुकाने शेवटचे दोन दिवस बंद ठेवण्यासाठीचा प्रस्ताव पोलिसांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाला पाठवला असल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. गणेशोत्सव निर्विघ्न पार पडेल, असा विश्वास पोलीस आयुक्तांनी व्यक्त केला.

विसर्जन मिरवणुकीच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत अमितेश कुमार यांनी सविस्तर माहितीदिली. यावेळी अतिरिक्त पोलीस आयुक्त प्रवीणकुमार पाटील, अरविंद चावरिया, परिमंडळ एकचे उपायुक्त संदीपसिंह गिल उपस्थित होते.

आयुक्त म्हणाले, “शहरात ३ हजार ७९८ सार्वजनिक मंडळांमध्ये तर, ६ लाख ६४ हजार २५७ घरगुती गणपतींची प्रतिस्थापना केली जाणार आहे. संपूर्ण गणेशोत्सवकाळात गणेश मंडळे, ढोलताशा पथके यांच्यासह शासकीय यंत्रणांशी वारंवार बैठका घेऊन समन्वय साधण्यात येणार आहे. बॉम्बशोधक आणि नाशक पथक, आरसीपी, क्यूआरटी आणि राज्य राखीव पोलीस दलाची पथके नेमण्यात आलेली आहेत. यंदाच्या गणेशोत्सवासाठी पोलीस आयुक्त, उपायुक्त आणि पोलीस ठाणेस्तरावर २०२ बैठका घेण्यात आल्या आहेत. उत्सवादरम्यान सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची करडी नजर राहणार आहे. गुन्हे शाखेची विशेष पथके नेमण्यात आली आहेत.

वाहतूक मार्गदर्शनासाठी वाहतूक शाखेकडूनदेखील वेळोवेळी माहिती जाहीर केली जाणार आहे. वाहतूक बदलासाठी ठिकठिकाणी फलक लावण्यात आले आहेत. सोनसाखळी चोरी, मोबाईल चोरी, पाकीटमारी, महिलांची छेडछाड रोखण्यासाठी पथके नेमण्यात आली आहेत. आणीबाणीच्या स्थितीत रुग्णवाहिकेसाठी स्वतंत्र मार्गांचे नियोजन करण्यात आल्याचे आयुक्त म्हणाले. सर्वत्र वॉच टॉवर, गस्ती पथ के तैनात करण्यात आली आहेत. मंडळांचे पदाधिकारी, शांतता कमिटी, पोलीस मित्र समिती यांनाही नियोजनात सहभागी करून घेण्यात आले आहे.




### 18 सप्टेंबर रोजीही मद्याची दुकाने बंद

» गणेशोत्सव काळात होणारे गैरप्रकार रोखण्याकरिता खबरदारीचा उपाय म्हणून शहरातील फरासखाना, विश्रामबाग आणि खडक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मद्य विक्रीची दुकाने, बार, देशी दारू दुकाने ७ सप्टेंबर ते १७ सप्टेंबरदरम्यान दहा दिवस बंद ठेवली जाणार आहेत. तसेच, विसर्जन मिरवणुकीदरम्यान होणारी भांडणे, हल्ले, महिला छेडछाड आदी रोखण्यासाठी १७ आणि १८ सप्टेंबर रोजी शहरातील सर्वच पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मद्याची दुकाने बंद ठेवली जाणार आहेत. तसा प्रस्ताव पुणे पोलिसांनी जिल्हाधिकारी आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे पाठवण्यात आल्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

### महत्त्वाच्या सूचना

» १२ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर या सहा दिवसांसाठी स्पीकर रात्री बारापर्यंत सुरू ठेवण्यास परवानगी.
» मंडळांनी मंडपाजवळ किंवा मिरवणुकीत ज्वालाग्राही पदार्थ वापरू नयेत.
» सीस्टिम लावताना आवाजाच्या डेसीबलसंदर्भात असलेल्या नियमांचे पालन करावे.
» रस्ते, रुग्णालय परिसरात फटाके वाजवण्यास बंदी.
» सुरक्षेसाठी आणि पोलीस बंदोबस्त याकरिता ‘माय सेफ पुणे’ ॲपचा प्रभावी वापर.

# 'दगडूशेठ' गणपतीसमोर 35 हजार महिलांचे अथर्वशीर्ष पठण व महाआरती

## ऋषीपंचमीनिमित्त आयोजित सोहळ्यात उर्जेने भारलेल्या वातावरणामध्ये हजारो महिलांच्या गर्दीचा उच्चांक यानिमित्ताने पहायला मिळाला.

**पुणे | प्रतिनिधी**

ओम नमस्ते गणपतये... ओम गं गणपतये नमः... मोरया, मोरया... च्या जयघोषाने तब्बल ३५ हजार महिलांनी एकत्र येत अथर्वशीर्ष पठणातून गणरायाला नमन केले. ऋषीपंचमीनिमित्त आयोजित सोहळ्यात उर्जेने भारलेल्या वातावरणामध्ये हजारो महिलांच्या गर्दीचा उच्चांक यानिमित्ताने पहायला मिळाला. पारंपरिक वेशात मध्यरात्री १ वाजल्यापासून महिलांनी या उपक्रमाकरीता हजेरी लावण्यास सुरुवात केली. गणेश नामाचा जयघोष करीत अथर्वशीर्षासोबत महाआरती करीत महिलांनी स्त्री शक्तीचा जागर केला.

निमित्त होते, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने उत्सवाच्या १३२ व्या वर्षी उत्सव मंडपासमोर आयोजित अथर्वशीर्ष पठण सोहळ्याचे. यावेळी ज्येष्ठ साहित्यिका डॉ. अरुणा ढेरे, वृषाली श्रीकांत शिंदे, ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, यतिश रासने, सौरभ रायकर, मंगेश सूर्यवंशी यांसह शुभांगी भालेराव, अर्चना भालेराव, प्रा. गौरी कुलकर्णी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दगडूशेठच्या उत्सव मंडपापासून ते नाना वाड्यापर्यंतच्या परिसरात महिलांनी अथर्वशीर्ष पठणाकरीता गर्दी केली. भक्तिरसात तल्लीन झालेल्या वातावरणात कार्यक्रमाची सांगता आरतीने झाली. पुण्यासह मुंबई, लातूर, कोल्हापूर, नाशिक व महाराष्ट्राच्या विविध ठिकाणाहून आलेल्या महिलांनी उपक्रमात सहभाग घेतला. उपक्रमाचे ३९ वे वर्ष होते.

डॉ.अरुणा ढेरे म्हणाल्या, बुद्धी हीच खरी शक्ती आहे. सर्व महिला आज गणरायाकडे बुद्धी मागायला मोठ्या संख्येने आल्याचे चित्र प्रेरणादायी आहे. प्रत्येक कार्यामागे बुद्धी आहे, एक विचार असतो. जे काही करतो, ते आपण बुद्धीपूर्वक करायला हवे. आज बाहेरील परिस्थिती बदलत चालली आहे. त्यामुळे महिलांनी आपली शक्ती जागृत करायला हवी, असेही त्यांनी सांगितले.



### वर्ल्ड रेकॉर्ड प्रमाणपत्र

» कार्यक्रमाच्या सुरुवातीला महिलांनी शंखनाद केल्यानंतर सोहळ्याला प्रारंभ झाला. त्यानंतर मन शांत करणारा ओंकार जप, गणेश जागर गीत आणि मुख्य अथर्वशीर्ष पठण करीत गणरायाला नमन केले महिला हात उंचावून टाळ्यांचा गजर करीत गणरायाला नमन करीत होत्या. गणेश नामाचा गजर करताना प्रत्येक महिलेच्या चेह-यावरील उत्साह ओसंडून वाहत होता. महिला अथर्वशीर्ष पठण उपक्रमाची दखल इंडिया स्टार वर्ल्ड रेकॉर्ड ने घेत डॉ. दीपक हरके यांनी ट्रस्टला प्रमाणपत्र दिले.

# गणेशोत्सवात भाविकांचा प्रवास खड्ड्यातूनच, दुरुस्त रस्ते दोन दिवसांत उखडले

## लाडक्या बाप्पाच्या आगमनाने पिंपरी चिंचवडकरांचा आनंद द्विगुणीत झालेला असताना, रस्त्यावरील बुजवलेले खड्डे, अर्धवट टाकलेली माती, मुरूम आणि खडी काही तासांत उखडली आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

लाडक्या बाप्पाच्या आगमनाने पिंपरी चिंचवडकरांचा आनंद द्विगुणीत झालेला असताना, रस्त्यावरील बुजवलेले खड्डे, अर्धवट टाकलेली माती, मुरुम आणि खडी काही तासांत उखडली आहे. यामुळे अशा खड्डेमय मार्गातून बाप्पांना घरी न्यावे लागणार आहे.

महापालिकेच्या अकार्यक्षमतेमुळे यंदाही बाप्पांचे आगमन खड्ड्यातून झाले. विशेष म्हणजे आयुक्तांच्या आदेशांना शहरातील ठेकेदारांनी एकप्रकारे केराची टोपली दाखवली आहे.

शहरातील बहुतांश रस्त्यांवर अद्यापही खड्डे कायम आहेत. शनिवारी गणेशोत्सव साजरा करण्यासाठी बाहेर पडलेले भाविक, नागरिकांना या खड्ड्यांतून प्रवास करावा लागणार आहे. खरेदी आणि बाप्पाला घरी नेताना याच खड्ड्यातून मार्ग काढावा लागेल.

आयुक्तांनी स्पष्ट आदेश देऊनही डांबरीकरणाऐवजी खडी, मुरुम, माती, पेव्हिंग ब्लॉक, कोल्डमिक्स, कॉंक्रिटच्या साहाय्याने खड्डे बुजवून रस्त्यांची डागडुजी केली आणि काही ठिकाणी सुरू आहे. पावसामुळे डांबरीकरणास अडथळे येत असल्याचे कारण सांगत सगळीकडे खड्डे बुजवण्याची घाई सुरू आहे. प्रत्यक्षात सकाळी बुजवलेला खड्डा पुन्हा सायंकाळी उखडलेला दिसून येत आहे.



### डागडुजीचा दिखावा

» ठिकठिकाणी रस्त्यावर पडलेल्या खड्डयाबाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी संबंधित उप अभियंतांना सूचना केल्या होत्या. त्यानंतर नेमलेल्या ठेकेदाराकडून ऐन पावसात तर, वाहनांची वर्दळ असलेल्या ठिकाणी घाईमध्ये खड्डे बुजवण्यात आले. त्यानंतर त्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आली. त्यामुळे केवळ दिखाव्यासाठी ही डागडुजी केल्याचे दिसून आले.

जलवाहिन्या, सांडपाणी वाहिन्या टाकण्यासाठी महापालिकेने अनेक रस्ते खोदले होते. अद्यापही काही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर खोदाई सुरू आहे. समाविष्ट गावांमध्ये आजही ही कामे सुरू आहेत. शिवाय, नागरिकांनीही खासगी कामासाठी अनेक ठिकाणी रस्ते खोदले आहेत. शिवाय, बीआरटी मार्गांवरील बसथांबे आणि स्मार्ट सिटीअंतर्गत बसथांब्यांवर लावलेल्या जाहिरात फलकांना वीजपुरवठा करण्यासाठीही रस्त्यांवर आडवे चर खोदून वीजवाहिन्या टाकल्या आहेत. मात्र, अनेक ठिकाणचे चर व्यवस्थित बुजवलेले नाहीत.

दुसरीकडे, उपनगरातही अंतर्गत भागात मोठ्या प्रमाणावर खड्डे पडले आहेत. काही व्यापाऱ्यांनी स्वतः खर्च करून खड्ड्यावरती माती, मुरुम, राडारोडा टाकला. मात्र, त्यामुळे रस्ते अधिकच निसरडे झाले होते. काही ठिकाणी माती निघून गेल्याने पुन्हा त्याच ठिकाणी मोठे खड्डे पडले. खोदकामांच्या ठिकाणी पक्के डांबरीकरण केलेले नव्हते. पावसामुळे रस्त्यांचे डांबरीकरण करणे अशक्य आहे. परिणामी, केवळ खड्डे बुजवण्यावर महापालिकेने भर दिला आहे.

शहरात रस्त्यावर खड्डे बुजवण्याचे काम सुरू आहे. सार्वजनिक वाहतूक म्हणून प्रवाशांना सेवा बीआरटी मार्गावरील खड्डयांकडे दुर्लक्ष झाले आहे. शहरात चार बीआरटी मार्ग सुरू आहेत. या मार्गामध्ये खड्डे पडले असून, त्यातूनच प्रवाशांना प्रवास करावा लागत आहे. प्रवास करताना बस चालकाला मोठी कसरत करावी लागत आहे. एवढेच नाही तर, पीएमपी बस खड्डयांमध्ये आदळून प्रवाशांचे कंबरडे मोडत आहे. दापोडी ते निगडी बीआरटी मार्गावर पीएमपी बसची सतत वर्दळ असते. त्याचप्रमाणे किवळे ते औंध आणि काळेवाडी देहू आळंदी या मार्गाचा मोठ्या प्रमाणात वापर प्रवासी करतात. सकाळ आणि सायंकाळी प्रवास करणाऱ्या विद्यार्थी, कामगारांची संख्या बरीच आहे.

### बाजारपेठात तात्पुरती डागडुजी

» पिंपरी-चिंचवड शहरातील खरेदीसाठी नागरिक पिंपरी, काळेवाडी, चिंचवड स्टेशन, डांगे चौक, आकुर्डी येथे जातात. मात्र, या ठिकाणी पडलेल्या खड्डयांवर तात्पुरती डागडुजी करण्यात आली होती. शुक्रवारी पडलेल्या हलक्या पावसामुळे त्यावरील माती वाहून गेली. त्यामुळे खरेदी करतानाही खड्डयांचा त्रास सहन करावा लागला.

### महत्त्वाच्या मार्गावरही तीच रड

» गणेशोत्सवात शहरातील महत्त्वाच्या मिरवणुका पिंपरी, चिंचवड, भोसरी, सांगवी, वाकड, दापोडी, थेरगाव, आकुर्डी-निगडी प्राधिकरण भागात निघतात. दापोडी, सांगवीतील मंडळे मुळा व पवना नदीमध्ये मूर्ती विसर्जन करतात. याच मार्गावर छोटे, मोठे मिळून असे भरपूर खड्डे पडले आहेत. यापैकी काही खड्डे बुजवूनदेखील पुन्हा खड्डे पडले आहेत पिंपरीतील सुभाषनगर घाट, पिंपरी गाव घाट, चिंचवडमधील मोरया घाटावर विसर्जन करतात. प्राधिकरणातील मंडळे गणेश तलाव, भोसरीतील मंडळे इंद्रायणी नदी किंवा विहिरीत मूर्ती विसर्जन करतात.

# कृत्रीम विसर्जन हौद व गणेश मूर्ती संकलन केंद्राची निर्मिती

## पिंपरीत माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या वतीने शिवराज्य चौक येथे केंद्राची निर्मिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी येथील माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या वतीने शिवराज्य चौक येथे गणेशोत्सव निमित्त कृत्रीम विसर्जन हौद व गणेश मूर्ती संकलन केंद्राची निर्मिती करण्यात आलेली आहे. या केंद्राचे उद्घाटन ह.भ.प. माऊली महाराज वाळुंजकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या विषयी अधिक माहिती देताना वाघेरे म्हणाले कि, पिंपरी चिंचवड शहरामध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यात यावा, या करिता सालाबाद प्रमाणे याही वर्षी शिवराज्य चौक तपोवन मंदिर रोड पिंपरीगाव या ठिकाणी विसर्जन हौद व संकलन केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. सदर केंद्रामध्ये नागरिकांना तसेच गणेशोत्सव मंडळ व संस्था यांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. या करिता ३ फूट उंच व ४ मीटर रुंदीचे दोन कुत्रीम हौदांची निर्मिती करण्यात आली असून नागरिकांना गणेशाच्या आरती करिता ७० X १०० आकाराचा भव्य मंडप देखील उभारण्यात आला आहे. या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ गणेश भक्तांनी घ्यावा असे आवाहन संदीप वाघेरे यांनी केले आहे.




सदर कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी माजी नगरसेवक संदीप वाघेरे, संदेश गोलांडे, जयवंत शिंदे, रामभाऊ कुदळे, गोकुळ भुजबळ, विजय जाचक, दुंडय्या स्वामी, सुधाकर यादव, अशोक कुदळे, अनिल रसाळ, पोपट महाराज इंगळे, हनुमंत वाघेरे, संदीप कापसे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे नियोजन मयूर बोडगे, गणेश मंजाळ, सारथी काळे, सचिन वाघेरे, शेखर अहिरराव, समीर वाघेरे यांनी केले.

# "कुटुंबसंस्था हा हिंदू संस्कृतीचा पाया!" : ॲड. सदानंद फडके

## श्रीराम जानकी मोफत कौटुंबिक समुपदेशन सेवा केंद्राचे उद्घाटन करताना ॲड. फडके बोलत होते

**पिंपरी | प्रतिनिधी**

"कुटुंबसंस्था हा हिंदू संस्कृतीचा पाया आहे!" असे विचार ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सदानंद तथा नंदू फडके यांनी कबीर बाग, नारायण पेठ, पुणे येथे रविवार, दिनांक ०८ सप्टेंबर २०२४ रोजी व्यक्त केले. विश्व हिंदू परिषद स्थापनेच्या षष्ट्यब्दीपूर्ती वर्षानिमित्त विश्व हिंदू परिषद, पश्चिम महाराष्ट्र प्रांत, विधी प्रकोष्ट संचलित श्रीराम जानकी मोफत कौटुंबिक समुपदेशन सेवा केंद्राचे उद्घाटन करताना ॲड. फडके बोलत होते. धर्माचार्य डॉ. सुभाषमहाराज गेठे, प्रांत मंत्री किशोर चव्हाण, प्रांत सह मंत्री ॲड. सतिश गोरडे, उपाध्यक्ष माधवी संशी, सी ए अभय माटे, ॲड. प्रशांत यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.



ॲड. सदानंद फडके पुढे म्हणाले की, "विश्व हिंदू परिषदेने आज खऱ्या अर्थाने कुटुंबसंस्थेसाठी मोठे विधायक कार्य केले आहे. या समुपदेशन केंद्राचे नाव 'गौरीशंकर' असे जास्त सयुक्तिक ठरले असते; कारण प्रभू रामचंद्र आणि सीतामाई यांचा त्याग अत्युच्च पातळीवरचा आहे. कुटुंबसंस्कृती या गाभ्यावरती हिंदू संस्कृती विराजमान झाली आहे. त्यामुळे काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत अनेक आक्रमणे आपण परतावून लावली. आहार, निद्रा, भय, मैथुन या चार घटकांसोबत विवेक हा महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे माणूस हा पशूपेक्षा वेगळा ठरतो. मतभेदावर मनोमिलन हा उत्तम उपाय आहे!"

डॉ. सुभाषमहाराज गेठे यांनी आपल्या आशीर्वचनपर मनोगतातून, "कोणतीही संस्था विशिष्ट विचार अन् ध्येयाने निर्माण केली जाते. कुटुंबसंस्थेत मात्र आपण जन्माला येतो; आणि मृत्यू येईपर्यंत त्या कुटुंबसंस्थेचा एक अविभाज्य घटक असतो. दोषापनयन अन् गुणाधान या दोन तत्त्वांनी कुटुंबसंस्कार केले जातात. ब्रह्मचर्य, वानप्रस्थ अथवा कोणत्याही अवस्थेतील व्यक्तीला कुटुंबसंस्थेचा आधार घ्यावाच लागतो!" असे मत मांडले.

# परदेशी तरुणांना गणेशोत्सवाची भुरळ

## गणेशभक्तीने भारावलेल्या या विदेशी तरुणांनी पहिल्या 'ग्लोबल गणेश फेस्टिवल'चे आयोजन पुण्यात करण्यात आले

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-मुंबईसह राज्यात मोठ्या भक्तीभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजर्या होणार्या गणेशोत्सवाची भुरळ पुण्यात शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांनाही पडली आहे. गणेशभक्तीने भारावलेल्या या विदेशी तरुणांनी पहिल्या 'ग्लोबल गणेश फेस्टिवल'चे आयोजन पुण्यात करण्यात आले.

पहिल्यांदाच झालेल्या 'ग्लोबल गणेश फेस्टिवल'चे उद्घाटन परदेशी तरुणांच्या हस्ते करण्यात आले. पुण्यातील गणेशोत्सव आयोजनात अग्रस्थानी असलेल्या कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून यावर्षीपासून आयोजित 'ग्लोबल गणेश फेस्टिवल'च्या निमित्ताने ग्लोबल गणेश समितिही यावेळी झाली.

लोकसहभाग, तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर, गणेशोत्सवादरम्यान परदेशी लोकांना आवश्यक सुविधा, मार्गदर्शन, जागतिक स्तरावर आयोजित होणाऱ्या गणेशोत्सवाला जोडून घेत उत्सवाचे आदानप्रदान झाले, ऐतिहासिक परंपरा असलेला गणेशोत्सव जागतिक लोकोत्सव होईल, अशा भावना गणेशोत्सवातील सक्रिय कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या.



शिवाजीनगर येथील हॉटेल प्राईड येथे आयोजित कार्यक्रमावेळी आफ्रिकन विद्यार्थी त्रिश आणि त्रोबा, जर्मन विद्यार्थिनी लोताया, डॉ. रघुनाथ कुचिक, डॉ. सतीश देसाई, रामनाथ सोनवणे, संयोजक वैभव वाघ, महेश सूर्यवंशी, शिरीष मोहिते, उदय जगताप, ॲड. अनीश पाडेकर, विनीत परदेशी, पियुष शहा, नितीन पंडित, धनश्री वाघ-पाटील, अनिरुद्ध येवले, योगेश आलेकरी आदी उपस्थित होते. यावेळी जर्मन विद्यार्थिनी लोताया हिने महाराष्ट्रातील परंपरागत मर्दानी खेळाचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

या समितमध्ये ग्लोबल गणेशोत्सवाने कशाप्रकारे पुण्याचे अर्थकारण व धार्मिक पर्यटन बदलेल, सोलो ट्रॅव्हलचा गणेशोत्सवाला होणारा फायदा, ग्लोबल गणेश पर्यटन, मोरया हेल्पलाईन, रोटरी क्लबचा ग्लोबल गणेश फेस्टिवलला होणारा फायदा, गणेशोत्सव जागतिक होण्यासाठी शिक्षणसंस्थांची भूमिका काय असेल, भारतीय आयोजकांनी काय करावे, शासनाची धोरणे व उपक्रम काय असावेत, अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

डॉ. सतीश देसाई म्हणाले की, "गणेशोत्सव जगाच्या नकाशावर जाण्यासाठी स्थानिक व परदेशी आयोजकांनी एकमेकांशी समन्वय साधायला हवा." महेश सूर्यवंशी यांनी धार्मिक पर्यटन विकसित करण्यासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा उभारण्याची गरज असल्याचे सांगितले.

### आंतरराष्ट्रीय पर्यटकांपर्यंत पोहोचण्याचे ध्येय

» संयोजक वैभव वाघ म्हणाले, "जगातील अनेक महोत्सवांपेक्षा गणेशोत्सव हा अधिक व्यापक व भव्यदिव्य स्वरूपाचा आहे. परंतु, या उत्सवाला म्हणावी तशी जागतिक स्तरावर ओळख मिळाली नाही. या उत्सवाचा पर्यटन केंद्र म्हणूनही मोठा विकास होऊ शकतो. परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी, त्यातून रोजगारनिर्मिती उभारण्यासाठी आणि आपला पारंपरिक व ऐतिहासिक गणेशोत्सव जगभर जाण्यासाठी 'ग्लोबल गणेश फेस्टिवल' आयोजित करण्यात येत आहे. या वर्षीपासून जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय पर्यटकांपर्यंत पोहचणे हेच मुख्य ध्येय आहे. जागतिक गणेश मंडळे व पुण्यातील गणेश मंडळांचा सामंजस्य करार घडवून आणण्यावर भर दिला जाणार आहे. यानिमित्ताने जागतिक स्तरावर विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन केले जाणार आहे."

# गणेशोत्सवात कृत्रिम फुलांचा वापर, शेतकरी राजा हवालदिल

## कृत्रिम फुले खरेदी करण्याकडे असलेल्या ओढीमुळे गेली महिनाभर कृत्रिम फुलांनी सजलेली दुकाने आज खाली होताना दिसली

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या आजच्या पहिल्या दिवशी ग्राहकांची कृत्रिम फुले खरेदी करण्याकडे असलेल्या ओढीमुळे गेली महिनाभर कृत्रिम फुलांनी सजलेली दुकाने आज खाली होताना दिसली; मात्र यामध्ये अनेक महिन्यां पासून गणपती सणाची वाट पाहत असलेल्या शेतकरी राजाची झेंडूची फुले मात्र सायंकाळच्या वेळी रस्त्याच्या कडेला अस्ताव्यस्त पडलेली पाहायला मिळाली.



जिथं आरती करायला रेडिमेड यंत्र आलं आहे, जिथं प्रसाद वाटायला रेडिमेड तंत्र आलं आहे, तिथं देवाला वाहायला ताजीतवानी फुलं तरी कशी मिळायची? प्लॅस्टिकच्या फुलांनी जिवंत फुलांनाच नाही, तर संपूर्ण मार्केटला काबीज केलं आहे. 80 टक्के सजावटी या प्लॅस्टिक फुलांनी सजल्या आहेत. ती स्वस्त आहेत असंही नाही; मात्र एकदा खरेदी केल्यावर वर्ष-दोन वर्षे वापरता येतात, म्हणून ग्राहक खूश. खरंतर पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातून सुवासिक, ताजी फुले पुण्यातील मार्केट यार्डात रोज येतात. तिथून जिल्हाभरातील फुल व्यावसायिक, हार तोरण बनवणारे व्यावसायिक खरेदी करत असतात मात्र काही दिवसांपासून सणासुदीला ओरिजनल फुलांची आरास केवळ 20 टक्केच होते. परंतु आकर्षक सजावटीसाठी प्लास्टिक फुले, पाने, तोरणे, फुलांच्या माळांची रेलचेल बाजारपेठेत आहे. अगदी 20 रुपयांपासून दोन हजार रुपयांपर्यंत प्लास्टिकचे सजावट साहित्य मिळते. फुले 20 रुपयांना 5, माळा 20 रुपयांना 1, तर 50 रुपयांना 3 अशा मिळतात. पानांचे वेल, गवताचा बेस, फुलांचे लटकन असे विविध प्रकार बाजारात सजले आहेत.

आकर्षक रंग आणि वर्ष-दोन वर्षे टिकण्याची गॅरंटी यामुळे ग्राहक अशा वस्तूंकडे आकर्षित होतात. परंतु याचा फटका निसर्गाला आणि पर्यायाने आपल्यालाच बसणार आहे याची जाणीव आताच व्हायला हवी. प्लास्टिकची ही फुले हव्या त्या रंगात, विविध आकारांत, थ्रीडी तंत्रज्ञानाद्वारे आकर्षक पद्धतीने बनविलेली असतात. शिवाय ही फुले हाताळायला सोपी असल्याने ग्राहक या प्लॅस्टिकच्या फुलांकडे मोठ्या प्रमाणावर आकर्षित होतात..

### शेतकरी आशावादी

» कुठलेही पीक घ्यायचं म्हटलं की, शेतकऱ्याला दोन तीन महिने आधी तयारी करावी लागते. शिरूर तालुक्यात ऊस हे प्रमुख पीक असले तरी सणासुदीला फुलांचे चांगले पैसे होतील या आशेने शेतकरी फुलांची लागवड करत असतो; मात्र श्रावणाच्या पहिल्याच मोठ्या सणासाठी ग्राहकांनी ओरिजनल फुलाकडे पाठ फिरवल्याने दोन तीन महिन्यांपासून गणेशोत्सवाची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्याला आज सायंकाळी झेंडूची फुले फेकून देत असताना हवालदिल झाल्याचे पाहायला मिळाले.

" दोन वर्षांपासून ग्राहकांनी कृत्रिम फुलांना पसंती देत ओरिजनल फुलांकडे पाठ फिरवली आहे. मागील काळात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जायचा. ओरिजनल फुलांच्या माळा बनवण्यासाठी, घरातील, मंडळातील डेकोरेशनसाठी कोकण, नाशिक जिल्ह्यांसह, खेड, हवेली जुन्नर तालुक्यांतील अनेक कारागीर पुणे मुंबई सारख्या शहरांमध्ये काम करण्यासाठी जात असत; मात्र मागील दोन वर्षांपासून कृत्रिम फुले बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत असल्याने शेतकऱ्यांवर त्यासोबतच फुलांचे हार तोरण बनवणाऱ्या अनेक कारागिरांचा रोजगार बुडाला आहे.

- स्वप्नील कुंजीर, शिवसेना ठाकरे गट संघटक.